# व्हिडीओकॉन 'डी२एच' रिचार्ज करा मोबाईलवर

मुंबई, दि. ५ - व्हिडीओकॉन 'डी२एच'ने मोबाईल पेमेंट क्षेत्रातील आघाडीच्या ॲटम टेक्नॉलॉजीसोबत भागीदारी करून आपल्या ग्राहकांसाठी मोबाईलवर डीटीएच रिचार्ज सेवा करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे व्हिडीओकॉन डी२एच ग्राहकांना रिचार्ज करणे अधिक सोपे होणार आहे.

व्हिडीओकॉन 'डी२एच'चे नोंदणीधारक आता आपल्या मोबाईल फोनवर <atom> हा संदेश लिहून तो ५४९५९ या क्रमाकांवर पाठवून 'ॲटम' नावाचे ॲप्लिकेशन सहजतेने डाऊनलोड करून आपले अकाउंट तत्काळ रिचार्ज करू शकणार आहेत. नोंदणी पूर्ण केल्यानंतर ग्राहकांना ही सेवा उपलब्ध होणार आहे. क्रेडिट कार्डचा उपयोग करून ते आपले अकाउंट रिचार्ज करू शकणार आहेत. ॲटम टेक्नॉलॉजीने व्हिडीओकॉन 'डी२एच' च्या नोंदणीधारकांसाठी आयव्हीआरवर आधारित प्लॅटफॉर्म यापूर्वीच बसविले आहे. आता मोबाईलवर आधारित रिचार्ज पर्याय उपलब्ध करून व्हिडीओकॉन 'डी२एच' आपल्या ग्राहकांना सोपी आणि अडचणमुक्त मोफत सेवा उपलब्ध करून देणार आहे. ॲटम प्लॅटफार्म सामान्य ग्राहकांना संपूर्ण सुरक्षित आणि स्वयंचलित पर्यावरण उपलब्ध करून देणार असून आपल्या क्रेडिट कार्डचा तपशील इतर दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचणार नसल्याचा दावा कंपनीने केला आहे. व्हिडीओकॉन 'डी२एच'चे सीईओ अनिल खेरा यांनी यासंदर्भात म्हटले की, 'रिचार्ज करण्यासाठी ग्राहक हे सोपे आणि सहज पर्याय शोधत असतात. हे आयव्हीआर प्लॅटफॉर्मच्या यशातून सिद्ध होत आहे. देवाणघेवाण करण्यासाठी सुरक्षित आणि वापरासाठी सोपे असून ॲटम टेक्नॉलॉजीच्या सिद्ध झालेल्या तंत्रज्ञानाचा आम्हाला आमच्या ग्राहकांना सोपे सोल्युशन देण्यामध्ये मदतगार सिद्ध झाले आहे, असेही खेरा यांनी सांगितले.